# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट** दिनांक :- २३/०४/२०२१

➢ कोवीड -१९ विषाणू संसर्गाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शासनाने विविध निर्बंध आणि लॉकडाऊनसाठी आदेश निर्गमित केलेले आहेत. दिनांक २१/०४/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये दिनांक २२/०४/२०२१ रोजीचे रात्री ०८.०० वा पासुन ते दिनांक ०१/०५/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजेपर्यत दिलेल्या नियमावली प्रमाणे आंतरजिल्हा/आंतरराज्य प्रवास करण्यास निर्बंध घालण्यात आलेले आहेत. अत्यावश्यक कारणासाठी नागरिकांना जर खाजगी वाहनाने आंतरजिल्हा/आंतरराज्य प्रवास करवयाचा असल्यास **https://covid19.mhpolice.in** या वेबसाईटवर ज्या अत्यावश्यक कारणास्तव प्रवास करावयाचा आहे त्या प्रवास करण्याच्या कारणांबाबतचे दस्तऐवजासह आपली वैयक्तीक माहीती/फोटो भरुन नागरिक ई-पास साठी ऑनलाईन अर्ज करु शकतात. सदर ई-पास मंजुर होणेसाठी वैध कारण व योग्य कागदपत्रे आवश्यक असुन **नागरिकांना खालील अत्यावश्यक कारणासाठीच नमुद वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करण्यास परवानगी राहील.**

- प्रवास करणा-या नागरिकांनी **त्यांच्या ७२ तासांच्या आतील ते RAT/RTPCR** निगेटीव्ह आलेबाबत प्रमाणपत्र सदर वेबसाईटवर सादर केले पाहीजे. **नागरिकांना दिर्घकालावधीसाठी पासेस मिळणेस प्रतिबंध करण्यात आला असुन ०३ दिवसापेक्षा जास्त कालावधीनंतरचा परतीचा प्रवास असेल तर परतीच्या ठिकाणाच्या संबंधित प्राधिका-याकडे ई-पास साठी अर्ज करावा.**

- **जवळच्या व्यक्तीचा मृत्यु /गंभीर आजार -** रक्ताचे नात्यातील व्यक्तीचा मृत्यु किंवा गंभीर आजाराबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र. सदर दस्तऐवज ई-पास साठी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सादर करावेत.

- **लग्न समारंभ- अ) मॅरेज पार्टी -** संबंधीतांकडुन परवानगी घेतली असल्यास रक्ताचे नात्यातील व्यक्ती वाहनाचे निम्म्या मर्यादेत प्रवासास करु शकतील. सोबत लग्नपत्रिका, परवाना, आमंत्रितांची नातेसंबंधांसह यादी इ. कागदपत्रे सोबत बाळगावीत व सदर दस्तऐवज ईपाससाठी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सादर करावेत.

- **ब) वैयक्तीक आमंत्रण** - वैयक्तीक व्यक्ती लग्नासाठी उपस्थित राहणा-या २५ आमंत्रितांपैकी एक आहे हे सिध्द करणारे कागदपत्रे, तसेच नातेसंबंध सिध्द करणारी कागदपत्रे व लग्न पत्रिका सोबत बाळगावी व सदर दस्ताऐवज ई-पास साठी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सादर करावी.

- **आपत्कालीन व्यवस्थापन व इतर अत्यावश्यक सेवेशी संबंधित** व्यक्ती, अत्यावश्यक सेवेसाठी प्रवास करणारे डॉक्टर, नर्स व आरोग्य विभागशी संबंधित व्यक्ती, कार्यालयीन कामकाजासाठी जिल्हयाबाहेर प्रवास करणारे सरकारी कर्मचारी इत्यादी नागरिकांनी त्यांच्या कर्तव्याचे ओळखपत्र व प्रवास करण्याच्या कारणाचे दस्ताऐवज सोबत बाळगल्यास त्यांना ई-पासची गरज लागणार नाही.

- **अत्यावश्यक सेवा व इतर वस्तु यांची मालवाहतुक करणा-या वाहनास संचारबंदीमधुन सुट दिली असल्याने कोणत्याही पासची आवश्यकता राहणार नाही.**

- **महत्वाचे कारण नसल्यास, अपुर्ण तपशिल, अवैध कागदपत्र निवडलेल्या अत्यावश्यकतेशी कागदपत्र संबंधित नसल्यास, अपुर्ण किंवा अपुरे कागदपत्र, फोटो अस्पस्ट असल्यास, पुर्वी पास दिला असल्यास व अधिकार क्षेत्राबाहेर असल्यास ई-पास देण्यात येणार नाहीत.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय ई-पास हेल्पलाईन नंबर 9529691966 वर संपर्क करावा.

**(सुधीर हिरेमठ)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.